## पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
## नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
## दिनांक 28/01/2020 (मंगळवार)
## (सकाळ)

---

### चोरी

1) पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 09 कि.मी अंतरावर मौजा पंचाळा रामटेक येथे दिनांक 18/01/2020 ते दिनांक 19/01/2020 चे रात्री दरम्यान फिर्यादी नामे– प्रदीप मारोतराव विलायतकर, रा. कन्हान टेकाडी हे बी–4 सोलोशन ली येथे टेक्नीशीयन म्हणून नोकरी करतात. आयडीया ए.टी.सी कंपनीचा इंजीनियर याने साईड डाऊन झाली म्हणून फोन केला असता तेव्हा फिर्यादी हे घटनास्थळी गेले असता आयडीया एटीसी अमर राजा 600 एएच कंपनीचा 24 बॅटऱ्या किं अंदाजे 50,000/– रू. च्या अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार नौरीया 9764811814 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 07 कि.मी अंतरावर केरडी वार्ड क्र. 2, कन्हान येथे दिनांक 26/01/2020 चे 22:00 वा. ते दिनांक 27/01/2020 चे 05:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– बाळु हंसाराम सतिबावणे, वय 39 वर्ष, रा. केरडी, वार्ड क्र. 2 कन्हान यांची बकरी चारणाऱ्याने बकऱ्या चारून फिर्यादींच्या घरासमोर सायवान मध्ये बांधले. तसेच फिर्यादी यांच्या शेजारी राहणारे वासुदेव वारले हिवसे यांचे सुध्दा दोन बकरे हे बांधलेले होते. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादींचे चार बकऱ्या किं 10,000/– रू. व वासुदेव हिवसे यांचे दोन बकरे कि. 7,000/– रू. असे एकुण कि. 17,000/–रू. चे चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार नरेश वरखडे 9637005303 हे करीत आहे.

3) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 19 कि.मी अंतरावर मौजा तलेगाव शिवार येथे दिनांक 26/01/2020 चे 20:00 वा. ते दिनांक 27/01/2020 चे 08:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– मुरलीधर माधवराव गमे, वय 59 वर्ष, रा. तलेगाव यांचे शेतातील झापडयामध्ये बांधलेले एक गाय व एक कारवड कि. 17,000/–रू. चे अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार लक्ष्मण रूढे 9923352646 हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. पारशिवनी :– दिनांक 26/01/2020 चे 20.30 वा. ते 20.40 वा. दरम्यान 19 वर्षीय पीडित/फिर्यादी ही बोरींगवर पानी भरण्यास गेली असतांना आरोपी नामे– प्रणित सहारे, रा. महादुला याने अंधरात पीडितेस एकटी पाहुन पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 354 भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार संगिता कोवे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर